विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४; आदर्श आचारसंहितेमध्ये 'काय करावे, काय करु नये' संदर्भातील मार्गदर्शक तत्वे >>पान 2

आमदारांच्या दोनच जागा आम्हाला मिळाल्या पुढच्या वेळी माझा विचार होईल >>पान 3

सिद्धार्थ खरात यांच्या नेतृत्वात विविध उपक्रम, सरस्वती कन्या विद्यालयाला सदिच्छा भेट >>पान 4

**सुविचार**

आपण परिस्थितीला शरण जाता कामा नये; परिस्थिती आपल्याला शरण गेली पाहिजे.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034




२५ लाखांची सुपारी, ६० ते ७० जण तैनात; सलमान खानचा गेम करण्यासाठी बिश्नोई गँगचे तगडे प्लॅनिंग आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 72 ■ शुक्रवार, दि. 18 ऑक्टोबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

# नागपूर पूर्व विधानसभा मतदारसंघात भाजपाचं पारडं जड, तर काँग्रेसकडून तुल्यबळ उमेदवार देण्याचे संकेत

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी : कधीकाळी काँग्रेस विचारांशी एकनिष्ठ राहिलेला नागपूर पूर्व विधानसभा मतदारसंघ २००९ पासून सलग भाजपाकडं आहे. या मतदारसंघात विद्यमान आमदार कृष्णा खोपडे हे भाजपाचे विद्यमान आमदार आहेत. कृष्णा खोपडे सलग तीनदा या मतदारसंघातून निवडून आले आहेत. यंदाच्या विधानसभा निवडणुकीत भाजपाकडून कृष्णा खोपडे हेच उमेदवार असतील असं सांगितलं जात असतानाच महाविकास आघाडीकडून कोण उमेदवार असणार, याची जोरदार चर्चा सुरु आहे. पाहू या नागपूर पूर्व विधानसभा मतदारसंघाचा लेखाजोखा...**

पूर्व नागपूर मतदारसंघाचा इतिहास : एकेकाळी काँग्रेसमध्ये असलेल्या कृष्णा खोपडे यांनी भाजपात प्रवेश केला. त्यांच्या म हानगर पालिकेत ते दोन वे[illegible] नगरसेवक झाले. त्यातच २००९ मध्ये कृष्णा खोपडे यांना भाजपानं नागपूर पूर्व मधून विधानसभेचं तिकीट दिलं. यावेळी खोपडे यांनी कमाल कामगिरी करत काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि तत्कालीन मंत्र सतीश चतुर्वेदी यांचा पराभव केला. तेव्हापासून सलग ते या म तदारसंघातून निवडून आले. नागपूर पूर्व या विधानसभा मतदारसंघात तेली, कुणबी, गुजराती, मारवाडी आणि हिंदी भाषक व्यापारी मतदार आहेत. या मतदार संघात अनेक विकासकामं केल्याचा दावा खोपडे [illegible] केला जातोय. त्याबरोबरच दांडगा जनसंपर्क ही खोपडे यांच्या जमेची बाजू आहे.



राज्यात महायुती सरकार आल्यापासून नागपूर पूर्व विधानसभा मतदारसंघ भाजपाकडं राहणार हे स्पष्ट आहे. मात्र, असं असलं [illegible] ही अजित पवार यांच्या राष्ट्रवादीच्या प्रदेश चिटणीस, प्रवक्त्या आणि राज्य महिला आयोगाच्या सदस्य आभा पांडे यांनीही इथून निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याचा निर्धार केलाय. पक्षानं उमेदवारी दिली नाही तर अपक्ष म्हणून लढण्याच्या तयारीत असल्याचंही आभा पांडे यांनी स्पष्ट केलंय. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गेल्या सहा महिन्यांपासून आभा पांडे यांनी मतदारसंघात जनसंपर्क वाढवल्याचं बघायला मिळतंय. तसंच आभा पांडे यांचे अनेक ठिकाणी मोठमोठे होर्डिंग्स आणि बॅनर्स लावण्यात आले आहेत. आभा पांडे या म ाजी नगरसेविका असून त्यापूर्वी काँग्रेसमध्ये होत्या. नागपूर म हानगरपालिकेच्या स्थायी समितीचे सभापतीपदही त्यांनी भूषवलंय. आभा पांडे २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत मध्य नागपुरातून उभ्या होत्या. मात्र, त्यावेळी त्यांना पराभवाचा सामना करावा लागला होता.

यंदाच्या लोकसभा निवडणुकीत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना याच मतदारसंघातून ७३,३७१ मतांचं सर्वाधिक मताधिक्य प्राप्त झालं. अगोदरपासून नागपूर पूर्व विधानसभा मतदारसंघावर काँग्रेसचं वर्चस्व राहिलंय. मात्र, २००९ मध्ये पहिल्यांदा भाजपानं पराभव केल्यानंतर काँग्रेस दरवेळी उमेदवार शेवटच्या क्षणाला जाहीर करत आहे.

यावेळी काँग्रेस नेत्या संगीता तलमले नागपूर पूर्व विधानसभा मतदारसंघातून काँग्रेसच्या प्रबळ दावेदार आहेत. विशेष म्हणजे संगीता तलमले यांचं नाव लोकसभा निवडणुकीतही काँग्रेस उमेदवार म्हणून चर्चेत आलं होतं.

### २०१९ च्या विधानसभा निवडणुकीतील प्राप्त मतं

कृष्णा खोपडे (भाजपा) – १,०३,९९२
पुरुषोत्तम हजारे (काँग्रेस) – ७९,९७५

### लोकसभा निवडणुकीत मिळालेली मतं

भाजपा: १,४१,३१३ (२०२४)
१,३५,४५९ (२०१९)
१,१२,९६८ (२०१४)
काँग्रेस: ६७,९४२ (२०२४)
६०,०७१ (२०१९)
४७,२२६ (२०१४)

### तेली समाजाची मतं निर्णायक

सध्याची राजकीय स्थिती पाहता भाजपाचं पारडं जास्त जड असल्याचं दिसून येतंय. कृष्णा खोपडे हे तेली समाजाचे असल्यानं महाविकास आघाडी कडूनही तेली समाजाचा उम ेदवार देण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळं यंदाच्या विधानसभा निवडणुकीत महायुतीविरुद्ध महाविकास आघाडीचा सामना अधिक रंजक होण्याची शक्यता आहे.

### दोन दिवसात सर्वच जागा स्पष्ट होतील; काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांची माहिती



दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** :विधानसभा निवडणुकीच्या जागा वाटपाबाबत सकारात्मक चर्चा झाली आहे.काही जागेवर चर्चा सुरु आहे. अवघ्या दोन दिवसात सर्वच जागा वाटपाबाबत स्पष्ट निर्णय होईल, अशी माहिती काँग्रेस कमिटीचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना दिली. यावेळी ते पुढे म्हणाले की, राज्यातील जागा वाटपाची यादी आजचं आम्ही पाठवणार आहोत. उद्या किंवा परवा दोन दिवसात सर्व जागा स्पष्ट होतील, ज्या जागेवर पेच निर्माण झाला आहे. त्या जागेबाबत अंतिम निर्णयासाठी हायकमांडकडे पाठवून चर्चा केली जाईल. उद्या किंवा परवा सर्वच जागा जाहीर करु, २०–२५ जागेचा प्रश्न आहे. मविआ जागेसंदर्भात तिनही हायकमांड निर्णय घेतील.उद्या सगळ्यात महत्वाची बैठक आहे. निवडणूक आयोगाची उद्या भेट घेऊ, निवडणूक पारदर्शक व्हावी लागेल,आमचा प्रयत्न आहे की २८८ एकत्र जाहीर कराव्या, अशी आमची भूमिका आहे. दि.२० ऑक्टोबरला आमची बैठक आहे. जयंत पाटील, शरद पवार यांच्यासह आमचे वरिष्ठ नेते निऱ्णय घेतील, आमचे आपसात भांडण लाऊ नका, हायकमांडचा निर्णय अंतिम राहील, महाराष्ट्राचा कौल हा महाविकास आघाडीच्या बाजुने आहे. असे मत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी यावेळी व्यक्त केले.

### विखेंच्या भेटीनंतर मनोज जरांगेंचा फडणवीसांना टोला, 'त्यांचा मालकच भरकटलाय, आता चर्चेचा काय उपयोग?'

**जालना/प्रतिनिधी** : महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजल्यानंतर मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी पत्रकार परिषद घेत महायुतीचा सुपडा साफ करणार, असा इशारा दिला आहे. यानंतर राज्याचे म हसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी अंतरवाली सराटीत काल मध्यरात्री मनोज जरांगेंची भेट घेतली. या भेटीनंतर मनोज जरांगे पाटील यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधलाय.

मनोज जरांगे म्हणाले की, इच्छुक उमेदवार यांच्या सोबत चर्चा आहे. म ुलाखत होणार नाही. ज्यावेळी पाडायचं की लढायच हे ठरेल, तेव्हा बाकीच्या बाबी ठरतील. आज फक्त चर्चा होणे आवश्यक आहे. इथे येणारे इच्छुक उद्याचे भविष्य आहेत. माझ्या समाजासाठी आजची चर्चा होणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले आहे. तर २० तारखेला इथे ९ वाजल्यापासून ४ पर्यत बैठक होईल. २० तारखेला संयमात या. २० तारखेची बैठक व्यापक आणि निर्णायक आहे. आता कोणाला शक्ती दाखवायची गरज नाही, असेही मनोज जरांगे म्हणाले.

# मविआचे जागा वाटप जाहीर होईना,अन् उद्धव ठाकरेंनी बोलावली आमदारांची तातडीने बैठक

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : विधानसभा निवडणुका जाहीर झाल्यानंतर राजकीय घडामोडींना वेग आला आहे. राज्यातील सत्ताधारी महायुती आणि विरोधी बाकांवरील महाविकास आघाडी यांच्यातील चर्चेचे गुऱ्हाळ अजूनही सुरू आहे. अशातच आता शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी आज सायंकाळी आपल्या पक्षांच्या आमदारांची बैठक बोलावली आहे. मातोश्रीवर आमदारांची बैठक होणार आहे. या बैठकीला उद्धव ठाकरे संबोधित करणार आहेत.

राज्यात विधानसभेसाठी पुढीला महिन्यात मतदान होणार आहे. जवळपास महिनाभराचा कालावधी प्रचारासाठी उमेदवारांना मिळणार आहे. त्यामुळे जागा वाटप अद्याप जाहीर न झाल्याने इच्छुकांच्या पोटात गोळा आला आहे. तर, दुसरीकडे काहींनी आपल्या निवडणूक प्रचाराची सुरुवातही केली आहे. महाविकास आघाडीत काही जागांचा तिढा कायम आहे. त्याशिवाय, महाविकास आघाडीतील इतर लहान घटक पक्षांनी आपल्या पारंपरीक जागा सोडण्याची मागणी मविआकडे केली आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर आज शिवसेना ठाकरे गटाच्या आमदारांची बैठक पार पडणार आहे.



**अँजिओप्लास्टीनंतर उद्धव यांची पहिली बैठक**

शिवसेना ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर काही दिवसांपूर्वीच अँजिओप्लास्टी शस्त्रक्रिया पार पडली होती. त्यानंतर काही दिवस विश्रांती घेतल्यानंतर उद्धव आपल्या राजकीय कार्यक्रमांमध्ये सहभागी होणार आहेत. आज होणारी आमदारांची बैठक हा त्यांच्या अँजिओप्लास्टीनंतरचा पहिला राजकीय कार्यक्रम आहे.

**मविआची पहिली यादी लवकरच?**

दरम्यान, विरोधी पक्षनेते आणि काँग्रेसचे नेते विजय वड्डेवटीवार यांनी सांगितले की, २० ऑक्टोबर रोजी पहिली यादी जाहीर होणार आहे. मविआत २१६ जागांची चर्चा पूर्ण झाली आहे. तर उर्वरित ६६ जागांवरही लवकरच चर्चा पूर्ण होणार आहे. विधानसभेच्या २८८ जागांवर मित्रपक्षांबाबतही चर्चा सुरू असल्याने काही वेळ लागत असल्याचे त्यांनी सांगितले. आज अथवा उद्या पत्रकार परिषद घेण्यात येणार असल्याचे सूतोवाच त्यांनी केले.

### सलमान खान आणि लॉरेन्स बिश्नोईमध्ये म ंडवली करण्यासाठी पुढे आली सोमी अली

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** : बॉलिवूड अभिनेता सलमान खानचा जवळचा मित्र आणि राजकारणी बाबा सिद्दीकी यांच्या हत्येनंतर मुंबईतील वातावरण खूपच भीतीदायक झालं आहे. बाबा सिद्दीकीच्या हत्येनंतर सलमान खानच्या जवळचे लोकही घाबरून आहेत. बाबा सिद्दीकी यांच्या हत्येची जबाबदारी लॉरेन्स बिश्नोई टोळीनं घेतली आहे.

अलीकडेच सलमान खानच्या घराची रेकी करून आणि त्याला धम की देणाऱ्यांना हरियाणामधून अटक करण्यात आली होती. आता सलम ान खानची एक्स गर्लफ्रेंड आणि अभिनेत्री सोमी अली हिच्या इन्स्टाग्राम पोस्टनं खळबळ उडवून दिली आहे. सोमी अलीने सोशल मीडियावर एक पोस्ट टाकून लॉरेन्स बिश्नोईचा फोन नंबर मागितला आहे. १६ ऑक्टोबरच्या रात्री, सोमी अलीनं तिच्या इंस्टाग्राम अकाउंटवर लॉरेन्स बिश्नोईचा एक फोटो शेअर केला आणि यावर लिहिलं, 'हॅलो, लॉरेन्स बिश्नोई भाई, मी ऐकले आणि पाहिले आहे की, तुम्ही जेलमधून झूम वरून कॉल करत आहात. मला तुमच्याशी काही बोलायचं आहे, कृपया मला सांगा की हे कसं शक्य होईल. संपूर्ण जगात आमचे आवडते ठिकाण राजस्थान आहे, आम्हाला तुमच्या मंदिरात यायचे आहे, पूजा करायची आहे. मात्र त्यापूर्वी, एक झूम कॉल तुमच्याशी करून बोलायचं आहे. याशिवाय मंदिरात पुजेनंतर तुमच्या फायद्याच्या गोष्टी होईल, यावर विश्वास ठेवा. मला तुमचा मोबाईल नंबर द्या, खूप मोठे उपकार होईल, धन्यवाद.'

# परिवर्तन महाशक्तीची पत्रकार परिषद : किती जागा लढवणार यावर चर्चा झाली - राजू शेट्टी

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी** : परिवर्तन महाशक्तीच्या कोअर कमिटीची आज बैठक झाली असून या बैठकीत विधानसभा निवडणुकीचा आढावा घेऊन कुठला पक्ष किती जागा लढवणार यावर सविस्तर चर्चा झाली. अशी माहिती दि .१७ ऑक्टोबर रोजी पत्रकार परिषदेत परिवर्तन महाशक्तीचे राजू शेट्टी यांनी दिली.



यावेळी राजू शेट्टी म्हणाले की मविआ आणि महायुती सारखे आम्ही चर्चेचे गुऱ्हाळ लावलेले नाही.पहिल्याच बैठकीत आमचे दीडशे मतदारसंघावर एकमत झाले आहे, उरलेल्या जागा पुढील बैठकीत फायनल करु.एका मतदारसंघात दोन–तीन पक्षांनी दावा सांगितल्यामुळे जागा राहिल्या आहेत. पण त्यावर समन्वयाने मार्ग काढू, सर्वसामान्य लोकं परिवर्तन महाशक्तीच्या मागे उभे राहिलेले दिसत आहेत.प्रत्येक मतदारसंघात विश्वासू चेहरा देणार आहे. मविआ आणि महायुती हे वेगवेगळ्या रंगाचे पॅकेजेस आहेत मात्र आतील माल एकच आहे. खऱ्या अर्थाने अस्सल विचार घेऊन आम्ही पुढे जाणार आहे.समाजातील प्रत्येक घटक, वंचिताला न्याय देणारी आमची परिवर्तन महाशक्ती आहे. दीडशे जागांवरील उमेदवार ते ते पक्ष ठरवतील.समाजाचील प्रत्येक घटकाला पुढे घेऊन जाणार आहे. अशी माहिती पत्रकार परिषदेत परिवर्तन महाशक्तीचे राजू शेट्टी यांनी दिली.




### बजेटचे डिझाईन बदलायचे आहे

शेतकरी, शेतमजूरांचे राज्य यावे ही भूमिका घेऊन आम्ही पुढे जात आहोत. बजेटचे डिझाईन बदलायचे आहे.भाजप आणि काँग्रेस हे धार्मिक लढाई उभे करणारे पक्ष आहेत. एका झेंडाच्या रंगाचे नाही तर तिरंगाचे सरकार आम्ही आणू .पवार म्हणतात आम्ही परिवर्तन आणू, ते कसले परिवर्तन आणतात ते सत्तेत असताना आणू शकले नाहीत, परिवर्तन आम्ही आणणार, बजेटमधील हिस्सा सामान्य माणसाच्या वाट्याला नेण्याचे परिवर्तन असेल. नुकसान नेत्यांचे होईल आणि फायदा जनतेचा होईल.

**–बच्चू कडू**

### सर्वांना एका छता खाली आणण्याची भूमिका

मनोज जरांगे पाटील यांच्याशी माझी सविस्तर चर्चा झाली आहे.ते मराठा समाजाचे नेतृत्व करतात, त्यांनी लवकर निर्णय घ्यावा आमच्या मध्ये आले तर आनंदच आहे.जरांगे पाटील हे आमच्यामध्ये नाही आले तरी त्यांनी निवडणूक लढवावी हा सकारात्मक दृष्टीकोन असेल.२० ऑक्टोबर रोजी ते बैठक घेणार आहेत. सर्वांना एका छताखाली आणणे ही भूमिका आहे. तर स्वराज्य ही चळवळ छत्रपती शाहू महाराज खासदार व्हायच्या आधीपासून सुरू आहे.कोल्हापूरची जागा स्वराज्यात स्वराज्याला देणार असा शब्द मला काँग्रेसच्या हाय कमांडने शब्द दिला होता.छत्रपती शाहू महाराजांचा उमेदवारी पुढे आल्यानंतर माझ्या समोरचे सगळे पर्याय थांबले.

**–छत्रपती संभाजीराजे.**

**आपल्या खुर्चीला कोणताही धोका नाही. कारण आपल्या मित्रपक्षातील अंतर्गत कलह आपल्याबरोबर आहे!**



## भारत - कॅनडा तणावाला ट्रूडोच जबाबदार

कॅनडा आणि भारताचे संबंध कमालीचे तणावग्रस्त बनले आहेत. कॅनडाचे पंतप्रधान जस्टीन ट्रूडो यांनी खलिस्तान फुटीरतावादी नेते हरदीपसिंग निज्जर याच्या हत्येत भारतीय गुप्तचर यंत्रणेचा हात असल्याचा आरोप केला इतकेच नाही तर भारतीय दूतावासातील उच्चायुक्त संजय कुमार वर्मा यांचा या हत्येशी थेट संबंध जोडण्याचा प्रयत्न केला. कॅनडातील एकंदर परिस्थिती पाहून भारताने कॅनडा मधील आपल्या अधिकाऱ्यांना माघारी बोलावून नवी दिल्लीतील कॅनडाच्या उच्चायुक्त कार्यालयातील सहा अधिकाऱ्यांची हकालपट्टी केली. कॅनडाने मागील वर्षीच हरदिपसिंग निज्जर याचा हत्येत भारताचा हात असल्याचा आरोप केला होता तेंव्हाच हरदीपसिंग निज्जर याच्या हत्येमागे भारताचा कोणताही हात नाही असे भारतीय परराष्ट्र खात्याने सांगितले होते त्यानंतर काही काळ गप्प बसलेल्या ट्रुडो यांनी पुन्हा तीच खेळी करत नव्हे त्याही पेक्षा पुढची खेळी करीत ही कारवाई केली. कॅनडाच्या या कारवाई नंतर भारतानेही कॅनडाच्या सहा वरिष्ठ अधिकाऱ्याची हकालपट्टी करून जशास तसे उत्तर दिले. या घटनेनंतर दोन्ही देशातील तणाव कमालीचा वाढला आहे आणि याला सर्वस्वी कॅनडाचे पंतप्रधान जस्टिन ट्रूडो हेच जबाबदार आहे. खलिस्तान या फुटीरतावादी संघटनेवर भारताने बंदी घातली आहे मात्र कॅनडा या देशाने खलिस्तानला कायम समर्थन दिले आहे. याच संघटनेने भारताच्या माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांची हत्या घडवून आणली आहे. भारतापासून अलग होऊन स्वतंत्र खलिस्तान राष्ट्र निर्माण करणे हे या संघटनेचे ध्येय आहे. १९८० च्या दशकात ही संघटना खूप आक्रमक होती. ही संघटना भारताच्या सार्वभौमत्वाला आव्हान देत आहे म्हणून भारताने तिच्यावर बंदी घातली मात्र आजही या फुटीरतावादी संघटनेचे काम चालूच आहे. या संघटनेला परदेशातून विशेषतः कॅनडा या देशातून आर्थिक आणि सामरिक मदत मिळते. १९८० च्या दशकात जेंव्हा खलिस्तान चळवळ जोमात होती तेंव्हा पासूनच कॅनडामधून त्यांना आर्थिक रसद पुरवली जात होती. आज ४० वर्षानंतही परिस्थिती बदलली नाही. आजही कॅनडा सरकार खलिस्तानचे उघड समर्थन करत आहे. कॅनडाचे पंतप्रधान जस्टीन ट्रुडो हे खुलेआम खलिस्तानवादयांचे समर्थन करत आहेत. त्यांच्या मंत्रिमंडळात खलिस्तान समर्थक मंत्र्यांचा समावेश आहे. अमृतपाल सिंग या खलिस्तानी अतिरेक्याला भारताने अटक केल्यावर विदेशातील खलिस्तान समर्थक कॅनडामध्ये एकवटले आहेत. कॅनडामध्ये भारतविरोधी कारवाया पाहून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ट्रुडो यांना भारतविरोधी खलिस्तानवाद्यांवर कारवाई करण्याची मागणी केली परंतु ट्रुडो यांनी पंतप्रधानांच्या मागणीकडे दुर्लक्ष केले. एव्हढेच नाही तर मागील वर्षी टोरोंटो आणि ओंटोरिया या शहरात खालसा स्थापना दिनाच्या कार्यक्रमाला त्यांनी हजेरी लावली. तिथे त्यांचे खलिस्तानचा ध्वज देऊन स्वागत करण्यात आले. ट्रुडो यांच्या या भूमिकेचा भारत सरकारने तीव्र शब्दात निषेध केला मात्र भारताच्या निषेधाकडे ट्रूडो यांनी दुर्लक्ष करत खलिस्तानला समर्थन देणे चालूच ठेवले. ट्रुडो यांची खलिस्तानवाद्यांना समर्थन देण्याची फुटीरतावादी भूमिका म्हणजे भारतविरोधी शत्रुत्वाची भावना आहे. वास्तविक भारताने कॅनडासोबत कायम मित्रत्वाचे संबंध ठेवले आहे. भारत कॅनडाला मित्रच मानतो मात्र कॅनडा फुटीरतावाद्यांना पाठबळ देत आहे त्यामुळे भारताने याची गंभीरपणे नोंद घेऊन कॅनडाला खडसावले. त्यामुळेच जस्टीन ट्रूडो यांनी हरदीपसिंग निज्जर याच्या हत्येचे भांडवल करून भारताशी पंगा घेतला आहे. अर्थात कॅनडा हे एकट्याच्या जोरावर करत नाही हे उघड आहे कॅनडाला काही देशांचा छुपा पाठिंबा आहे. पाकिस्ताननेही या वादात उडी घेऊन कॅनडा ला पाठिंबा दिला आहे. सातत्याने हा वाद उकरून कढण्यामागे जस्टिन ट्रूडो यांचा राजकीय स्वार्थ आहे पुढील वर्षी कॅनडात निवडणुका होणार असून ट्रूडो हे पुन्हा निवडणुकीस उभे राहणार आहे. मात्र परिस्थिती त्यांना अनुकूल नाही. बेरोजगारी, महागाई यामुळे त्यांच्या विषयी तेथील नागरिकात प्रचंड नाराजी आहे निवडणूक पूर्व सर्व्हेक्षणात त्यांच्या पक्षाची पिछेहाट दिसत आहे त्यामुळे कॅनडात असलेल्या साडे सात लाख शीख नागरिकांची मते आपल्या बाजूने वळावित

# विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४; आदर्श आचारसंहितेमध्ये 'काय करावे, काय करु नये' संदर्भातील मार्गदर्शक तत्वे

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलडाणा/प्रतिनिधी** :: भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३२४ अन्वये निवडणुका मुक्त, निर्भय व पारदर्शक वातावरणात पार पडाव्यात, तसेच राजकीय पक्ष व उमेदवार यांच्या मार्गदर्शनासाठी आदर्श आचारसंहिता तयार करण्यात आली आहे. आचारसंहिता कालावधीत उमेदवारांनी व राजकीय पक्षांनी 'काय करावे' व 'काय करु नये' याबाबत निवडणूक आयोगाने तयार केलेली सुची पुढीलप्रमाणे आहे.



**काय करावे :**

१) निवडणुका घोषित होण्यापूर्वी क्षेत्रात प्रत्यक्षपणे सुरु करण्यात आलेले कार्यक्रम पुढे चालू ठेवता येतील. २) ज्याविषयी शंका निर्माण होईल अशा बाबींच्या संबंधात, भारत निवडणूक आयोग/राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांच्याकडून स्पष्टीकरण/मान्यता प्राप्त करण्यात यावे. ३) पूर, अवर्षण, रोगाची घातक साथ किंवा इतर नैसर्गिक आपत्ती यामुळे प्रभावित झालेल्या क्षेत्रांतील जनतेसाठी पीडा निवारण आणि पुनर्वसन कार्य सुरु करता व चालु ठेवता येऊ शकेल. ४) मरणासन्न किंवा गंभीररित्या आजारी असलेल्या व्यक्तींना उचित मान्यतेने रोख रक्कम किंवा वैद्यकीय सुविधा देण्याचे समुचित मान्यतेने पुढे चालू ठेवता येईल. ५) मैदानासारखी सार्वजनिक ठिकाणे निवडणूक सभा घेण्यासाठी सर्व पक्षांना/ निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांना नि:पक्षपातीपणे उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत. त्याचप्रमाणे, हेलिपॅडही सर्व पक्षांना/ निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांना निपक्ष:पातीपणे उपलब्ध करुन दिला पाहिजे. ६) इतर राजकीय पक्ष आणि उमेदवार यांच्यावरील टिका, त्यांची धोरणे, कार्यक्रम पूर्वीची कामगिरी आणि कार्य या बाबींशी संबंधित असावी. ७) शांततामय आणि उपद्रवरहित गृहस्थजीवन जगण्याचा प्रत्येक व्यक्तीच्या अधिकाराचे पूर्णपणे जतन करण्यात यावे. ८) स्थानिक पोलीस प्राधिकाऱ्यांना प्रस्तावित सभांची जागा आणि वेळ याबाबत पुरेशी आगाऊ सूचना देऊन आवश्यक ती परवानगी घेतलेली असावी. प्रस्तावित सभेच्या जागी कोणतेही निर्बंधात्मक किंवा प्रतिबंधक आदेश जारी केलेले असल्यास त्याचे पूर्णपणे पालन करण्यात यावे. आवश्यक असल्यास त्याबाबत सूट मिळण्याकरिता अर्ज केले पाहिजेत आणि अशी सूट वेळीच मिळवावी. प्रस्तावित सभेसाठी ध्वनिवर्धकांचा वापर करण्याची आणि अशा इतर कोणत्याही सुविधांसाठी परवानगी मिळवली पाहिजे. ९) सभांमध्ये अडथळे आणणाऱ्या किंवा सुव्यवस्था बिघडवणाऱ्या व्यक्तींचा बंदोबस्त करण्यासाठी पोलिसांची मदत घेण्यात यावी. १०) मिरवणूक सुरु होण्याची वेळ आणि जागा, ती जेथून जाणार असेल तो मार्ग आणि ती जेथे संपणार असेल ती वेळ आणि जागा अगोदर निश्र्चित करण्यात येईल आणि पोलीस प्राधिकाऱ्यांकडून त्यासाठी आगाऊ परवानगी घेण्यात यावी. मिरवणूक जेथून जाणार असेल त्या भागांमध्ये कोणताही निर्बंधक आदेश जारी असल्यास, त्याबाबत खात्री करुन घेऊन, त्याचे पूर्णपणे अनुपालन करण्यात यावे. त्याचप्रमाणे, वाहतूक विनियम आणि इतर निर्बंध यांचेही अनुपालन करण्यात यावे. मिरवणुकीमुळे वाहतुकीला अडथळा होऊ देऊ नये, मतदान शांततापूर्ण आणि सुनियोजितरितीने पार पडावे यासाठी निवडणूक अधिकाऱ्यांना नेहमीच सहकार्य करावे, सर्व कार्यकर्त्यांनी बिल्ले व ओळखपत्र ठळकपणे लावावीत. ११) मतदारांना पुरविण्यात आलेल्या अनौपचारिक ओळखचिठ्ठ्या साध्या (पांढऱ्या) कागदावर असाव्यात आणि त्यावर कोणतेही चिन्ह, उमेदवाराचे नाव किंवा पक्षाचे नाव असू नये. प्रचाराच्या कालावधीमध्ये व मतदानाच्या दिवशी वाहने चालविण्यावरील निर्बंधाचे पूर्णत: पालन करण्यात यावे. १२) निवडणूक आयोगाकडून वैध प्राधिकारपत्र मिळविलेल्या व्यक्तींनाच फक्त मतदार, उमेदवार व त्यांचे निवडणूक/ मतदार प्रतिनिधी याव्यतिरिक्त कोणत्याही मतदान कक्षात प्रवेश करता येईल. इतर व्यक्ती कितीही उच्चपदस्थ असली तरी (उदा. मुख्यमंत्री, मंत्री, खासदार किंवा आमदार इत्यादी) तिला अटीतून सूट मिळणार नाही. १३) निवडणुका घेण्याविषयीची कोणतीही तक्रार किंवा समस्या, आयोग/ निवडणूक निर्णय अधिकारी/ क्षेत्र/ प्रक्षेत्र दंडाधिकारी/ भारत निवडणूक आयोग यांनी नियुक्त केलेल्या निरीक्षकांच्या निदर्शनास आणून देण्यात याव्यात. निवडणूक आयोग/ निवडणूक निर्णय अधिकारी/ जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या निवडणुकीच्या विविध पैलूंशी संबंधित असलेल्या सर्व बाबींविषयीचे निर्देश/ आदेश/ सूचना यांचे पालन करण्यात यावे.

**काय करु नये :**

१) शासकीय वाहने किंवा कर्मचारी वर्ग किंवा यंत्रणा याचा निवडणूक प्रचार विषयक कामासाठी वापर करण्यात येऊ नये. २) सत्ताधारी पक्ष/शासन यांनी केलेल्या कामगिरीविषयी सरकारी राज्यकोषातील खर्चाने कोणतीही जाहिरात काढण्यास प्रतिबंध आहे. कोणताही मंत्री तो किंवा ती उमेदवार असल्याशिवाय किंवा फक्त मतदानासाठी मतदार म्हणून आला असेल तरच त्याला मतदान कक्षात किंवा मतमोजणीच्या जागी प्रवेश करता येईल. इतर कारणासाठी प्रवेश करता येणार नाही. ३) कोणत्याही वित्तीय अनुदानाची घोषणा करणे, कोनशिला बसविणे, नवीन रस्ते इ. बांधण्याचे वचन देणे इत्यादी गोष्टी करु नयेत. शासन/सार्वजनिक उपक्रम यांच्या सेवेत कोणत्याही तदर्थ नियुक्त्या करु नयेत. ४) शासकीय कामाची निवडणूक मोहीम, निवडणूक प्रचार कार्यासोबत सरमिसळ करु नये. ५) मतदाराला, पैशाचे किंवा अन्य कशाचेही प्रलोभन दाखवू नये. मतदारांच्या जातीय समूह भावनांना आवाहन करु नये. वेगवेगळ्या जाती समूह किंवा धार्मिक किंवा भाषिक गट यांच्यामधील विद्यमान मतभेद वाढतील किंवा परस्पर द्वेष किंवा तणाव निर्माण करतील असे कोणतेही काम करण्याचा प्रयत्न करु नये. ६) इतर पक्षांचे नेते किंवा कार्यकर्ते यांच्या सार्वजनिक जीवनाशी संबंधित नसलेल्या खाजगी आयुष्याच्या कोणत्याही पैलूंवर टीका करण्याची परवानगी दिली जाणार नाही. इतर पक्ष किंवा त्यांचे कार्यकर्ते यांच्यावर, विपर्यस्त माहितीच्या आधारावर टिकाटिप्पणी करु नये. ७)मंदिरे, मशिदी, चर्च, गुरुद्वार किंवा इतर कोणतेही प्रार्थनास्थळ यांचा वापर निवडणूक प्रचाराची भाषणे, भित्तीपत्रके, संगीत यांच्यासह निवडणूक प्रचाराची जागा म्हणून केला जाणार नाही. ८)मतदारांना लाच देणे, मतदारांवर गैरवाजवी दडपण, मतदारांना धाकदपटशा दाखविणे, तोतयागिरी, मतदार केंद्रापासून १०० मीटर्सच्या आत निवडणूक प्रचार करणे, मतदान समाप्त करण्यासाठी निश्र्चित केलेल्या वेळेच्या आधीच्या ४८ तासात सार्वजनिक सभा घेणे आणि मतदारांची मतदान केंद्रावर ने-आण करण्यासाठी वाहनाची व्यवस्था करणे यासारख्या भ्रष्ट प्रथा किंवा निवडणूक अपराध समजल्या जाणाऱ्या गोष्टींना मनाई आहे. ९) लोकांच्या मतांचा किंवा त्यांच्या कामांचा निषेध करण्यासाठी त्यांच्या घरासमोर निदर्शने करणे किंवा धरणे यांचा कोणत्याही परिस्थितीत अवलंब केला जाणार नाही. १०) स्थानिक कायद्यांच्या अधीन राहून कोणत्याही व्यक्तीची जमीन, इमारत, आवार भिंत, वाहने इत्यादींच्या मालकाच्या विशिष्ट परवानगीशिवाय (जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याला दाखविण्यासाठी व त्यांच्याकडे जमा करण्याकरिता) ध्वजदंड उभारण्यासाठी, निशाण्या लावण्यासाठी, सूचना चिकटविण्यासाठी, घोषणा लिहिण्यासाठी कोणीही वापर करणार नाही. ११)इतर राजकीय पक्ष आणि उमेदवार यांनी आयोजित केलेल्या सार्वजनिक सभा किंवा मिरवणुका यांच्यामध्ये कोणताही अडथळा निर्माण करु नये. १२) ज्या ठिकाणी इतर पक्षांच्या सभा घेतल्या जात असतील अशा ठिकाणांहून मिरवणूक नेऊ नये. मिरवणुकीतील लोक, क्षेपणास्त्र किंवा शस्त्र म्हणून ज्याचा दुरुपयोग केला जाऊ शकतो अशा कोणत्याही वस्तू जवळ बाळगण्यात येऊ नयेत. १३)इतर पक्षांनी व उमेदवारांनी लावलेली प्रचारपत्रके, भिंतीपत्रके काढून टाकू नयेत अथवा विद्रुप करु नयेत. १४) मतदानाच्या दिवशी ओळखचिठ्ठ्या वाटपाच्या ठिकाणी किंवा मतदान कक्षाच्या जवळ भित्तीपत्रके, ध्वज, चिन्हे आणि इतर प्रचार साहित्य यांचे प्रदर्शन करु नये. १५) ध्वनीवर्धकांचा मग ते एका जागी लावलेले असोत किंवा चालत्या वाहनावर बसविलेले असोत, त्यांचा सकाळी ६ पूर्वी किंवा रात्री १० नंतर आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या लेखी पूर्वपरवानगीशिवाय वापर करण्यात येऊ नये. १६)संबंधित प्राधिकाऱ्याच्या लेखी पूर्वपरवानगीशिवाय, सार्वजनिक सभा आणि मिरवणुका यांच्यामध्येही ध्वनीवर्धकाचा वापर करण्यात येऊ नये. सर्वसाधारणपणे अशा सभा/ मिरवणुका रात्री १० नंतर चालू ठेवण्याची परवानगी देण्यात येऊ नये आणि त्याशिवाय त्याचा वापर स्थानिक कायदे, त्या जागेच्या सुरक्षा व्यवस्थेचे प्रत्यक्ष ज्ञान आणि हवामानाची स्थिती, सणासुदीचा मोसम, परीक्षेचे दिवस इ. सारख्या परिस्थितीच्या अधीन असेल. १७) निवडणुकीच्या काळात कोणत्याही प्रकारे मद्याचे वाटप करण्यात येऊ नये. १८)ज्या व्यक्तीच्या सुरक्षिततेला धोका असल्याबाबत खात्री पटली आहे आणि म्हणून तिला सरकारी सुरक्षा पुरविण्यात आली आहे अशी कोणतीही व्यक्ती मतदानाच्या दिवशी, त्याच्या सुरक्षा कर्मचारीवर्गासह मतदान केंद्र असलेल्या जागेच्या परिसरात (१०० मीटर्सच्या आत) प्रवेश करणार नाही. तसेच, अशी कोणतीही व्यक्ती, मतदानाच्या दिवशी, त्याच्या सुरक्षा कर्मचारीवर्गासह मतदारसंघामध्ये फिरणार नाही. जर सरकारी सुरक्षा पुरविलेली व्यक्ती मतदार असेल तर, केवळ मतदान करण्यासाठी सोबत असलेल्या सुरक्षा कर्मचारीवर्गासह त्याच्या/ तिच्या ये-जा करण्यावर निर्बंध घालील. १९) ज्या व्यक्तीच्या सुरक्षिततेला धोका असल्याबाबत खात्री पटली आहे आणि म्हणून तिला सरकारी सुरक्षा पुरविली आहे किंवा त्या व्यक्तीकडे खाजगी सुरक्षा रक्षक आहेत अशा कोणत्याही व्यक्तीची निवडणूक प्रतिनिधी किंवा मतदान प्रतिनिधी किंवा मतमोजणी प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करण्यात येऊ नये. (सदर सूची सर्वसमावेशक नसून याबाबत कोणतीही शंका असल्यास भारत निवडणूक आयोग किंवा राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांच्याकडून मान्यता घेण्यात यावी.)

# धडाकेबाज कारवाई ते आरोपांचा धुरळा, समीर वानखेडे निवडणुकीच्या रिंगणात का?

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी** : नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरोचे झोनल अधिकारी म्हणून काम केलेले आणि आपल्या कारवाईने चर्चेत आलेले आयआरएस अधिकारी समीर वानखेडे हे पुन्हा एकदा चर्चेत आले आहेत. समीर वानखेडे हे आता राजकारणात एन्ट्री घेणार असून थेट निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहेत. समीर वानखेडे हे शिवसेना शिंदे गटाकडून मैदानात उतरणार आहेत. सूत्रांच्या माहितीनुसार समीर वानखेडे हे मुंबईतील धारावी मतदारसंघातून निवडणूक लढवणार आहेत. मागील विधानसभा निवडणुकीत काँग्रेसच्या वर्षा गायकवाड यांनी विजय मिळवला होता. हा मतदारसंघ अनुसूचित जाती प्रवर्गासाठी आरक्षित आहे. पण, सनदी सेवेची नोकरी सोडून समीर वानखेडे राजकारणात का येणार आहेत, याची चर्चाही सुरू झाली आहे.समीर वानखेडे यांनी २००८ मध्ये केंद्रीय लोकसेवा आयोगाची (ळझएण) नागरी सेवा परीक्षा उत्तीर्ण केली. त्यांना भारतीय महसूल सेवा मिळाली. पहिली पोस्टिंग मुंबईत झाली. याशिवाय त्यांनी इन्कम टॅक्स एअर इंटेलिजन्स युनिट, नॅशनल इन्व्हेस्टिगेशन एजन्सीमध्येही अनेक महत्त्वाच्या पदांवर काम केले आहे.

कर विभागात कार्यरत असताना समीर वानखेडे यांनी कर चोरी प्रकरणी २५०० जणांवर कारवाईचा बडगा उगारला होता. यातील २०० हुन अधिकजण हे बॉलिवूडशी संबंधित होते. त्यांच्या या कारवाईने जवळपास ८७ कोटींचा महसूल मिळाला होता.

एनसीबीमध्ये पोस्टिंग, बॉलिवूड कलाकारांना धसका

२०१९ मध्ये समीर वानखेडे यांना नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरोचे झोनल संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर त्यांनी अनेक धडाकेबाज कारवाई केली. त्यांनी विविध कारवाईत १७०० कोटींहून अधिक किमतीचे अमली पदार्थ जप्त केले होते. अमली पदार्थ प्रकरणी बॉलिवूड कलाकारही त्यांच्या रडारवर आले होते.

अभिनेता दिवंगत सुशांत सिंह राजपूतने आत्महत्या केल्यानंतर अमली पदार्थांच्या सेवनाचा मुद्दा समोर आला. त्यानंतर समीर वानखेडे यांनी सुशांतची मैत्रीण रिया चक्रवर्ती आणि तिचा भाऊ शौविक चक्रवर्ती यांना ताब्यात घेतले. दोघांनाही एनडीपीएस कायद्यान्वये अटकही केली. नोव्हेंबर २०२० मध्ये समीरने कॉमेडियन भारती सिंग आणि तिच्या पतीवरही ड्रग्ज प्रकरणी कारवाई केली होती.

आर्यन खानला अटक ष

समीर वानखेडे आणि त्यांच्या टीमने मुंबईतील एका क्रूझवर छापा मारला. यावेळी त्यांनी अभिनेता शाहरुख खानचा मुलगा आर्यन खानला अटक केली. या कारवाईने देशभरात मोठी खळबळ उडाली. त्यानंतर काही दिवसांत आर्यन खान याला जामीन मिळाला.

नवाब मलिक यांचे आरोपष

आर्यन खानवरील कारवाईनंतर समीर वानखेडे चांगलेच चर्चेत आले होते. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि तत्कालीन मंत्री नवाब मलिक यांनी समीर वानखेडे यांच्या सगळ्या कारवाईवर प्रश्न उपस्थित केले होते. नवाब मलिक यांनी वानखेडेंविरोधात आरोपांचा धुरळा उडवला होता. यामध्ये समीर वानखेडे यांची जातवैधता ते महागडी लाईफस्टाइल आणि केलेल्या कारवायांबाबत प्रश्न निर्माण झाले होते.

सीबीआयकडून गुन्हा दाखलष

शाहरुख खानचा मुलगा आर्यन खान याला या प्रकरणात अडकवू नये म्हणून २५ कोटी रुपयांची लाच मागितल्याच्या आरोपावरून वानखेडेवर सीबीआयने गेल्या वर्षी मे महिन्यात गुन्हा दाखल केला होता. एनसीबीच्या तक्रारीवरून वानखेडे आणि इतरांवर भारतीय दंड संहितेच्या कलम १२०-बी (गुन्हेगारी कट) आणि ३८८ (खंडणीची धमकी) तसेच भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत तरतुदींनुसार गुन्हा दाखल करण्यात आला.

आर्यन खान प्रकरणी झालेल्या आरोपानंतर एनसीबीने वानखेडे आणि इतरांविरुद्ध अंतर्गत दक्षता चौकशी केली आणि सीबीआयला सर्व माहिती दिली. त्यानंतर सीबीआयने गुन्हा दाखल केला. सध्या हे प्रकरण कोर्टात आहे.



राजकारणात एन्ट्री?

मलिक यांनी केलेल्या आरोपानंतर समीर वानखेडे हे आपल्या अमरावतीमधील गावी आणि परिसरात सामाजिक कार्यात सक्रिय झाले होते. त्याच वेळी समीर वानखेडे हे राजकारणात येणार असल्याची चर्चा सुरू झाली होती. मात्र, समीर यांनी ही चर्चा फेटाळून लावली होती. आता, समीर वानखेडे हे राजकीय मैदानात उतरणार असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

निवडणुकीसाठी धारावीच का?

समीर वानखेडे हे मुंबईतील धारावी मतदारसंघातून निवडणूक लढवणार असल्याची चर्चा आहे. धारावी मतदारसंघ हा अनुसूचित जाती प्रवर्गासाठी राखीव आहे. काँग्रेसच्या वर्षा गायकवाड या मतदारसंघातून आमदार म्हणून निवडून गेलेल्या. त्या लोकसभा निवडणुकीत विजयी झाल्याने आता काँग्रेस कोणाला उमेदवारी देणार, याकडे लक्ष लागले आहे. तर, दुसरीकडे समीर वानखेडे हे अनुसूचित जातीतील आणि मुस्लिम असल्याने त्यांना फायदा होण्याची शक्यता आहे. समीर वानखेडे यांच्यामुळे महायुतीपासून दुरावलेला मुस्लिम मतदार पुन्हा त्यांच्याकडे वळेल अशी अटकळ आहे. समीर वानखेडे हे आपल्या धडाकेबाज कारवाईने चर्चेत राहिल्याने त्याचाही फायदा त्यांना या मतदारसंघात होऊ शकतो. नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत धारावी मतदारसंघातून महाविकास आघाडीचे अनिल देसाई आघाडीवर होते. आता, विधानसभा निवडणुकीसाठी समीर वानखेडे यांना उमेदवारी दिल्यास मविआच्या समीकरणांना धक्का बसू शकतो.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### शासकीय मालमत्तेवर राजकीय पक्षांनी जाहीराती करू नये; मनपा आयुक्त खांडेकर यांची सूचना




दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहिता दरम्यान कोणत्याही राजकीय पक्षाने, उमेदवाराने किंवा राजकीय पदाधिकाऱ्यांनी महानगरपालिका हद्दीतील कोणत्याही शासकीय इमारतीवर पोस्टर बॅनर किंवा घोषणाबाजी, राजकीय पक्षाचे घोषवाक्य इत्यादीचा वापर करू नये. प्रॉपर्टी डिफेंसमेन्ट ॲक्ट नुसार कायद्याने सक्त मनाई असून अशा प्रकारच्या नियमांचे उल्लंघन करू नये असे अवाहन मनपा आयुक्त संतोष खांडेकर यांनी केले आहे. राजकीय पक्षांना प्रचारासाठी ज्या सभा वैगरे घ्यायचे असतील त्याची महानगरपालिका किंवा निवडणूक विभागाच्या अधिकाऱ्यांकडे रीतसर परवानगी घेऊन बॅनर पोस्टर लावावेत अन्यथा आचारसंहितेचे उल्लंघन केल्याप्रकरणी नियमानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येईल. अनाधिकृत बॅनर,भित्तीपत्रके,जाहीरात, झेंडे ई ॲड पोस्ट या मनपा कडून परवानगी शिवाय लावू नयेत. प्रत्येक जाहीरातीवर प्रकाशक आणि मुद्रकाचे नाव प्रकाशित करणे बंधनकारक असल्याचे मनपा आयुक्त संतोष खांडेकर यांनी सांगितले आहे.


### कृषी अधिकारी कार्यालयात पिक विम्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटना तालुकाअध्यक्षाचा आत्महत्येचा प्रयत्न



दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** हदगाव तालुक्यामध्ये मागील वर्षी अतिवृष्टी झाली होती. मात्र त्यावेळी शासनाने पंचनामे करून सुद्धा शेतकऱ्याला मोबदला मिळाला नव्हता. याबद्दल शेतकरी संघटनेने वारंवार पिक विमा कंपनीला व तसेच कृषी विभागाला तक्रार देऊन सुद्धा दखल घेतली नसल्यामुळे आज शेतकरी संघटनेचे तालुका अध्यक्ष चांगलेच आक्रमक झाले होते. शेतकरी संघटनेचे तालुका अध्यक्ष प्रल्हाद पाटील हडसणीकर यांनी तालुका कृषी अधिकारी कार्यालय हादगाव यांच्या दालनामध्ये आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. मात्र वेळीच पोलिसांनी त्यांच्या हातातील विषाची बाटली काढून घेतली त्यामुळे अनर्थ टळला आहे. २०२३-२४ मध्ये झालेले पंचनामे कंपनीचे कार्यालय बंद असल्यामुळे रखडले होते मात्र आज पुन्हा त्याचा पंचनामा केला आहे आणि शेतकऱ्यांनी केलेले अर्ज जिल्हाधिकारी व पिक विमा कंपनीकडे पाठवण्यात येत आहेत अशी माहिती तालुका कृषी अधिकारी सदाशिव पाटील यांनी दिली आहे.

### ५० खोके वाले सरकार पाडण्यासाठी योग्य उमेदवारी दिल्या जातील- चित्रलेखा पाटील




दैनिक आपला विदर्भ

**रायगड/प्रतिनिधी :** आगामी विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजले आहे. शेतकरी कामगार पक्षाच्या रायगड जिल्हा महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील यांनी अलिबाग मुरुड मतदारसंघात भव्य स्वरूपाच्या महिला संवाद मेळाव्यांनी वातावरण शेकापमय केलेय. या मेळाव्यांना उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळतोय. शेतकरी कामगार पक्षातील सर्वच नेतेमंडळी हे एकसंघपणे निवडणुकीला सामोरे जाणार असल्याने शेकापला मोठं बळ आणि उभारी मिळाले असल्याचे बोलले जातेय. शेतकरी कामगार पक्षाची नाळ तळागाळातील सर्वसामान्य जनतेशी जोडली आहे. आम्हाला जास्तीत जास्त उमेदवारीची संधी मिळाली तर त्या जागा जिंकून हे आमदार जास्तीत जास्त जनतेची सेवा करतील, ५० खोके वाले सरकार पाडण्यासाठी योग्य उमेदवारी दिल्या जातील असा विश्र्वास चित्रलेखा पाटील यांनी व्यक्त केला.या महिला संवाद मेळाव्यास हजारो युवती व महिलांची उपस्थिती होती.

### वन विभागाची कारवाई; खैराचा अवैध साठा जप्त

**बुलडाणा/प्रतिनिधी :** बुलढाणा वनपरिक्षेत्र अंतर्गत वनपरिमंडळ नियतक्षेत्र बिरसिंगपुर मधील बुलडाणा-सिल्लोड रस्ता लगत देऊळघाट येथील बस स्टॅडच्या पाठीमागे अवैध खैर लाकुड साठा असल्याची माहिती धुळे विशेष अन्वेषण पथकाने दिली. त्यानुसार वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी तातडीने कारवाई करत खैराचा अवैध साठा जप्त केला. यामध्ये अंदाजे ११ घ.मी. खैर लाकुड साठा जप्त करुन संबंधीतांवर वन गुन्हा नोंदविण्यात आला. पुढील तपास सुरु असल्याची माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी वर्षा कोळेकर यांनी प्रसिद्धी पत्रकाव्दारे दिली.

# आमदारांच्या दोनच जागा आम्हाला मिळाल्या पुढच्या वेळी माझा विचार होईल

## रुपाली चाकणकर यांची पत्रकार परिषदेत माहिती

दैनिक आपला विदर्भ

**पुणे/प्रतिनिधी :** पुणे शहरातील वाढत्या अत्याचाराच्या घटनांबाबत, पुणे पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांची भेट घेत रुपाली चाकणकर यांनी घेत शहरातील वाढत्या अत्याचाराच्या घटनांचा दि.१७ ऑक्टोबर रोजी आढावा घेतला. त्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी माहिती दिली. यावेळी पत्रकारांनी उपस्थित केलेल्या आमदारांच्या प्रश्र्नाबाबत यावेळी राज्यपाल नियुक्त आमदारांच्या दोनच जागा मिळाल्या, पुढच्या वेळी माझा विचार होईल, अशी माहिती दिली. राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष पदाचा चार्ज घेतल्यानंतर रुपाली चाकणकर यांनी दि.१७ ऑक्टोबर रोजी पोलीस आयुक्त इतर अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली

यावेळी त्यांनी बोपदेव घाट घाटना आणि इतर घटनाबाबत तसेच पुन्हा अशा घटना घडू नये, यासाठी काय करायला हवे याबाबत आयुक्तांशी चर्चा केली. पुणे शहरातील २७४ हॉटस्पॉट काढले आहेत. महाविद्यालयीन तरुण-तरुणीच्या ठिकाणी जातात ती ठिकाणी पोलिसांना माहिती असली पाहिजे, बाहेरून येणारा माणूस महाराष्ट्राची बदनामी करत असून त्याची माहिती घ्यावी, अशा सुचना चाकणकर यांनी केल्या. तर यावेळी आयुक्तांनी शाळा परिसरात गर्दीच्या ठिकाणी सीसीटीव्ही, लवकरात लवकर बसवण्यात येईल, असे आश्र्वासन आयुक्तांनी दिले.

बीट मार्शल दामिनी पथक शाळा महाविद्यालय मध्ये उपस्थितीत असतील, पुण्यात शिक्षण घेण्यासाठी आलेल्या मुला मुलींनी कुठे जावे जाऊ नये याची माहिती आता मुलांना मिळणार आहे.बोपदेव घाट मधील दोन आरोपी मिळून आले आहे,तिसरा आरोपी लवकरच सापडेल,आरोपीचा गुन्हे शाखा शोध घेत आहे. या आरोपींना फाशीची शिक्षा होईल, फास्टट्रॅक कोर्टात केस चालवली जाईल, त्यांना फाशीचीच शिक्षा होईल यासाठी प्रयत्न केला जाईल, अशी माहिती आयुक्तांनी यावेळी दिली असल्याचे चाकणकर यांनी सांगितले.

तर राज्यपाल नियुक्त आमदाराबाबत माहिती देताना सांगितले की, तीन जागा आमच्या वाट्याला आल्या असत्या तर महिला म्हणून मला आमदारकी मिळाली असती परंतु दोनच जागा आम्हाला मिळाल्या, पुढच्या वेळी माझा विचार केला जाईल, मला अपेक्षा होती मी मागणी केली होती. परत एकदा महिला आयोगाचा अध्यक्षपद दिले. तर सन २०१९ ला मी मागणी केली होती,




खडकवासला लढवणार म्हणून मी तिकडे काम करत होते, आता अजित पवार यांच्याकडे खडकवासला मागणी केली. पण महायुतीत खकडवासला भाजपकडे आहे, त्यामुळे आम्ही महायुतीचा धर्म पाळून काम करणार आहे. बाहेरून आलेल्या लोकांना पक्षाचे ध्येय धोरणे माहित नसतात अगोदर पक्षाचे ध्येयधोरणे समजून घ्यावे लागतात त्याबद्दल जास्त न बोललेलं बरं नाही.आपल्याला दिलेलं पद समाज आणि पक्ष याच्यासाठी करावा,ज्यांना आयोगाचा कार्यकाल माहिती नाही त्यांनी बोलू नये.असा टोलाही त्यांनी लगावला.मी बचत गटापासून संघटनेचे काम करत आहे. महाराष्ट्राचे संघटन सांभाळले आहे. आयोगाच हे संविधानिक पद आहे. त्यामुळे मला माविआर काळातच दिले होत. निवडणुकीनंतर महायुतीची सत्ता येणार आहे. मग राहिलेल्या राज्यपाल नियुक्त आमदारांच्या जागा सत्ता आल्यानंतर नियुक्त्या केल्या जातील. अशी प्रतिक्रिया महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी दिली.

## २५ लाखांची सुपारी, ६० ते ७० जण तैनात; सलमान खानचा गेम करण्यासाठी बिश्नोई गँगचे तगडे प्लॅनिंग

**मुंबई/प्रतिनिधी :** अभिनेता सलमान खानला मारण्यासाठी बिश्नोई गँगने २५ लाख रुपयांची सुपारी घेतल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. सलमान खान बिश्नोई गँगच्या निशाण्यावर आहे. माजी मंत्री बाबा सिद्दीकी यांच्या हत्येनंतर सलमान खानच्या सुरक्षेत वाढ करण्यात आली असून त्याला आता वाय प्लस दर्जाची सुरक्षा देण्यात आली आहे. नवी मुंबई प्रकरणात सलमान खानला मारण्यासाठी बिष्णोई टोळीने २५ लाख रुपयांची सुपारी घेतली होती.

सलमान खानचा गेम करण्यासाठी बिश्नोई गँगचं तगडं प्लॅनिंग

सलमान खानच्या हत्येचा बिश्नोई गँगचा प्रयत्न होता. बॉलिवूड अभिनेता सलमान खानच्या घरावर गोळीबार करण्यात आला होता. सलमान खानच्या हत्येचा प्रयत्न केल्याप्रकरणी तपास करत असलेल्या नवी मुंबई पोलिसांनी या प्रकरणी अटक केलेल्या लॉरेन्स बिश्नोई टोळीतील पाच आरोपींविरुद्ध आरोपपत्र दाखल केले होते. आता सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, बिश्नोई गँगने सलमान खानला मारण्यासाठी २५ लाख रुपयांची सुपारी दिल्याचं पोलिसांनी आरोपपत्रात म्हटलं आहे.

सलमान खानला मारण्यासाठी आरोपींनी पाकिस्तानातून अख ४७, अख ९२ आणि १ १६ ही आधुनिक शस्त्रे विकत घेण्याची योजना आखली होती. याशिवाय ज्या बंदुकीने पंजाबी गायक सिद्धू मूसेवाला याची हत्या करण्यात आली होती, त्या तुर्कीने बनावटीच्या जिगना हत्यारने आरोपी सलमान खानला मारण्याच्या प्रयत्नात होते. आरोपी सलमान खानच्या हालचालींवर पाळत ठेवून होते, यासाठी अनेक जण तैनात करण्यात आले होते.

## अहमदनगरच्या राजकारणातील मोठी बातमी, सुजय विखे पाटील अपक्ष निवडणूक लढवणार?

**अहमदनगर/प्रतिनिधी :** अहमदनगरच्या राजकारणातील आताची सर्वात मोठी बातमी समोर आली आहे. संगमनेर मतदारसंघातून माजी खासदार सुजय विखे पाटील यांना भाजपकडून उमेदवारी नाकारण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिलीये. सुजय विखे पाटील यांनी संगमनेर मतदारसंघातून निवडणूक लढण्याची तयारी दाखवली होती. मात्र एकाच घरत दोघांना उमेदवारी नको असं सांगत भाजपनं त्यांना तिकीट नाकारल्याची माहिती सूत्रांनी दिलीय. महायुतीमध्ये संगमनेरची जागा ही शिवसेनेकडे आहे.. त्यामुळे या जागेवर कोणता उमेदवार असणार याबाबत चर्चा रंगलीये. सुजय विखे पाटलांना उमेदवारी नाकारल्यानं बाळासाहेब थोरात आणि सुयज विखेमधील बिग फाईट टळण्याची शक्यता आहे.

विखे पाटलांनी जरांगेंची घेतली भेट?

सुजय विखेंना उमेदवारी नाकारण्यात आल्याची माहिती समोर आलेली असतानाच राधाकृष्ण विखे पाटलांनी मनोज जरांगे पाटलांनी अंतरवाली सराटीत भेट घेतली. विखे पाटील आणि जरांगे यांच्या बंददाराआड झालेल्या चर्चेबाबत उत्सुकता निर्माण झालीय. सुजय विखे पाटील अपक्ष लढण्याबाबत चाचपणी करत नाही ना अशी चर्चा सुरु झालीय. अपक्ष लढायचं असल्यास मराठा समाजाची रसद मिळेल का याचा राधाकृष्ण विखे पाटील अंदाज तर घेत नाही ना असेही बोलले जातेय. सुजय विखे पाटील यांनी यापूर्वी संगमनेर किंवा राहुरीतून लढण्याची तयारी दाखवली होती.

सुजय विखे पाटील अपक्ष लढणार?

२०१९च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी सुजय विखे पाटलांनी नगर दक्षिणमधून काँग्रेसकडून उमेदवारी मागितली होती. उमेदवारी न मिळाल्यानं त्यांनी भाजपचं कमळ हातात घेतलं होतं. तसं विखे पाटील घराण्याला पक्ष बदलणं नवं नाही. त्यामुळं राज्यातील बदललेले राजकीय वारे पाहून सुजय विखे पाटील अपक्ष म्हणून रिंगणात उतरण्याचा निर्णय घेऊ शकतात असे बोलले जातेय.

दरम्यान, आजही भाजपची यादी येणार नसल्याची माहिती समजतेय. आज भाजप उमेदवारीची पहिली यादी जाहीर होणार असल्याची माहिती होती. मात्र आजही भाजपची पहिली यादी जाहीर होणार नसल्याची माहिती आहे.. त्यामुळे भाजपच्या उमेदवारीच्या यादीला मुहूर्त कधी लागणार हे पाहावं लागणार आहे.

ब्राम्हण समाजाची भाजपकडे मागणी

राज्यातील २८८ पैकी ३० जागांवर ब्राम्हण समाजाचा उमेदवारा द्यावा अशी मागणी सकल ब्राम्हण समाजाने केलीये. पुण्यातील कसबा मतदारसंघही ब्राम्हण समाजालाच द्यावा आणि त्या जागेवर भाजप शहराध्यक्ष धीरज घाटेंना उमेदवारी द्यावी अशी मागणीही ब्राम्हण समाजाने केलीये. कसबा पोटनिवडणुकीची पुनरावृत्ती टाळायची असेल तर ब्राह्मण उमेदवारालाच संधी द्या अशी आग्रही मागणी सकल ब्राह्मण समाजाचे भालचंद्र कुलकर्णी आणि राशीचक्र फेम भगरे गुरूजींनी भाजपकडे केलीये.

## धनंजय मुंडेविरोधात शरद पवार गटाचा उमेदवार ठरला, परळी मतदारसंघात भगवान सेनेचे फुलचंद कराड रिंगणात?

दैनिक आपला विदर्भ

**बीड/प्रतिनिधी :** लोकसभा निवडणुकीत पंकजा मुंडे यांना धक्का दिल्यानंतर आता शरद पवार गटाने विधानसभा निवडणुकीत धनंजय मुंडे यांना घेरण्याची तयारी सुरु केली आहे. धनंजय मुंडे यांच्याविरोधात बीडच्या परळी विधानसभा मतदारसंघात तगडा उमेदवार देण्यासाठी शरद पवार गटाकडून चाचपणी सुरू आहे. अशातच भगवान सेनेचे सरसेनापती फुलचंद कराड यांनी विधानसभा निवडणूक लढविण्याची तयारी दर्शवून शरद पवार गटाकडून उमेदवारी मिळाल्यास धनंजय मुंडे यांच्या विरोधात निवडणूक लढविण्यासाठी दंड थोपटले आहेत.

गेल्या विधानसभा निवडणुकीत धनंजय मुंडे यांनी बहीण पंकजा मुंडे यांचा पराभव करत शरद पवार गटाकडून निवडून आले होते. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेसच्या फुटीनंतर शरद पवार यांच्याकडून धनंजय मुंडे यांच्या विरोधात तगडा उमेदवार देण्यासाठी चाचपणी सुरू आहे.

अशातच फुलचंद कराड यांनी निवडणूक लढविण्याची तयारी दर्शवली आहे. फुलचंद कराड दिवंगत गोपीनाथ मुंडे यांच्या पहिल्या फळीतील नेते आहेत. निवडणुकीच्या तोंडावर परळीतून अनेक इच्छुक उमेदवारांनी शरद पवारांची भेट घेतली आहे. परंतु पवारांच्या खेळीतून धनंजय मुंडे यांच्याविरोधात नेमका कोणता उमेदवार असणार? याची उत्सुकता सर्वांना लागली आहे.



जयंत पाटील २४ ऑक्टोबरला उमेदवार अर्ज भरणार

शरद पवार गटाच्या शिवस्वराज्य यात्रेदरम्यान इस्लामपूरमध्ये सभा पार पडली. यावेळी जयंत पाटील यांनी येत्या २४ तारखेला उमेदवारी अर्ज भरणार असल्याची घोषणा केली. ते वाळवा विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

महायुतीच्या जागावाटपात अजितदादा गटाला ४५ ते ५० जागा मिळणार?

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला ४५ ते ५० जागा मिळणार आहेत, या चर्चेत तथ्य नाही, अशी माहिती अजितदादा गटाच्या नेत्याने दिली. महायुतीच्या जागावाटपात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वाट्याला ६० पेक्षा जास्त जागा येतील. पक्षाचे ६० विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार निश्चित झाले असून उरलेल्या काही उमेदवारांवर आज शिक्कामोर्तब होणार आहे. बुधवारी अजित पवार आणि सुनील तटकरे यांची बैठक पार पडली, याच बैठकीत नावांवर शिक्कामोर्तब झाले. आज केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासोबत बैठक पार पडल्यानंतर पक्षाकडून तत्काळ उमेदवारांची नावे जाहीर करण्यात येतील.

# डिजी यात्राने डी-केवायसी अभियान सुरु केले; गोपनीयतेसह सुविधेचे दिले वचन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** डिजी यात्रा एक अत्याधुनिक सेल्फ-सॉव्हरीन आयडेन्टिटी आधारित इकोसिस्टम आहे, जी फेस बायोमेट्रिक टेक्नॉलॉजीच्या मदतीने विमानतळांवर संपर्करहित आणि सुरळीत प्रवासी प्रक्रिया करते. डिजी यात्राने आपल्या डी-केवायसी अभियानाच्या आरंभाची घोषणा केली आहे. हे अभियान ४ ऑक्टोबर रोजी सुरू झाले आहे.

'डोन्ट नो यॉर कस्टमर' बॅनरखाली, हे अभियान ग्राहकांची व्यक्तिगत माहिती संग्रहित किंवा ॲक्सेस केल्याशिवाय ग्राहकांच्या गरजा पूर्ण करण्याबाबत डिजीयात्राची वचनबद्धता अधोरेखित करते. डेटा उल्लंघन आणि डेटाचा दुरुपयोग या सामान्य बाबी असणाऱ्या आजच्या जगात डिजी यात्राचा दृष्टिकोन सुरक्षित आणि जबाबदार डेटा मॅनेजमेंटसाठी एक नवीन मानदंड प्रस्थापित करतो.

डिजी यात्रा फाऊंडेशनचे सीईओ सुरेश खडकभावी म्हणाले, आमचे ॲप वापरताना यूझर्सना सुरक्षित आणि आश्वस्त वाटेल याची खातरजमा करून प्रवास सुरळीत आणि त्रास-मुक्त बनवणे हे आमचे प्राथमिक लक्ष्य आहे. या अभियानाचा शुभारंभ आमच्या भावी विकासाच्या तयारीच्या दृष्टीने एक मोठे पाऊल आहे. भावी महत्त्वाकांक्षी प्रसार योजनांसह आम्ही आमच्या यूझर्सना डिजी यात्राच्या प्रायव्हसी बाय डिझाईन अप्रोचबद्दल शिक्षित करण्यासाठी जास्तत जास्त लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी समर्पित आहोत. ज्यामधून आमच्या सेवांची सुरक्षा आणि विश्वासार्हता सुनिश्चित होते.

डिजी यात्राच्या संचालनाच्या मुळाशी सेल्फ-सॉव्हरीन आयडेन्टिटीचे तत्व आणि वर्ल्ड वाइड वेब कंसोरटियम मानकांचे पालन आहे. व्हेरिफायेबल क्रेडेंशीयल्स, डिसेन्ट्रलाईझ्ड आयडेंटिफायर्स आणि डिस्ट्रीब्यूटेड लेजर टेक्नॉलॉजीच्या मदतीने ही कंपनी खातरजमा करते की, आपल्या ग्राहकांचे त्यांच्या खाजगी डेटावर पूर्ण नियंत्रण असेल. डेटा सुरक्षा आणि गोपनीयतेच्या उच्च जागतिक मानकांचे पालन करताना विमानाने उड्डाण केल्यानंतर २४ तासांच्या आत सर्व संवेदनशील माहिती सुरक्षित पद्धतीने हटवली जाते.




कंपनीने आपल्या मार्केटिंग धोरणाचा एक भाग म्हणून ही कंपनी डोन्टनोयुअरकस्टमर आणि डिजी यात्रासारख्या हशटॅगचा उपयोग करून सोशल मीडियाच्या माध्यमातून यूझर्ना या अभियानात सामील होण्यासाठी प्रोत्साहित करते. या अभियानात संतुष्ट ग्राहकांचे व्हिडिओ आणि ॲपची गोपनीयता वैशिष्ट्ये आणि लाभ दर्शविणारे इन्फोग्राफिक्स देखील समविष्ट असतील, ज्यांच्यामुळे डिजी यात्रा प्रवाशांचा विश्वसनीय साथीदार बनते.

६.५ मिलियन ॲप यूझर्स आणि देशभरात २४ ठिकाणी संचालनासह डिजी यात्रा विश्वासाच्या महत्त्वावर नेहमीच जोर देते आणि प्रवाशांना एक अशी इकोसिस्टम प्रदान करते, ज्यात सुविधा आणि गोपनीयता यांना एकसमान प्राधान्य दिले जाते.

## विविध वृत्त...

### लहान वाहनांना संपूर्ण महाराष्ट्रात टोल माफी द्यावी -माजी राज्यमंत्री सुबोध सावजी यांचे राज्यपालांना पत्र

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी** : मुंबई शहराप्रमाणे उर्वरित महाराष्ट्रातील सर्व टोल नाके हे लहान वाहनासाठी टोलमुक्त करावे, याबाबत आपण आदेश निर्गमित करावे,अशी मागणी माजी राज्यमंत्री सुबोध सावजी यांनी दि. १६ ऑक्टोबर रोजी महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांना पत्राद्वारे केली आहे. राज्यमंत्री सुबोध सावजी यांनी राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांना दिलेल्या पत्रात नमूद केले आहे की, राज्य सरकारने निवडणूक आचारसंहिता लागण्याच्या एक दिवस आधी मुंबई शहरात येणाऱ्या लहान वाहनांना टोलमाफी दिली आहे. याप्रमाणेच उर्वरित संपूर्ण महाराष्ट्रात आपल्या मार्फत ही सवलत लागू करून मुंबई शहराप्रमाणेच टोल माफी द्यावी, याबाबत आपण आदेश निर्गमित करावे, असे पत्र दिले आहे. या पत्रावर माजी राज्यमंत्री सोबत सावजी यांची स्वाक्षरी आहे.



### महिला अत्याचाराच्या वाढत्या घटनांवरुन छ. संभाजीनगर शहरातील पोलीस ॲक्शन मोडवर; शाळेत कुठलाही गैरप्रकार घडू नये यासाठी पोलीस घेणार खबरदारी



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी** : महाराष्ट्रात मागील काही दिवसांपासून वाढत्या अत्याचाऱ्याच्या घटनांमुळे महिला सुरक्षेचा विषय ऐरणीवर आला आहे. शासन स्तरावरुन सर्वत्रच महिला व मुलींच्या संरक्षणासाठी उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत. त्या अनुषंगाने छत्रपती संभाजीनगर शहर पोलीस क्शन मोडवर आले आहे. प्रत्येक पोलीस स्टेशनमधील एक पोलीस अधिकारी जनजागृतीसाठी नेमला आहे आणि त्यांच्यासोबत दोन महिला पोलीस कर्मचारी देखील असतील. त्यांना वेगवेगळ्या सूचना देण्यात आल्या आहेत जसे प्रत्येकाने त्या-त्या हद्दीतील शाळा- महाविद्यालये,कोचिंग क्लासेस यांना भेटी द्यावात व तेथील कर्मचाऱ्यांची चारित्र पडताळणी यात कोणी संशयित आढळला तर त्याच्यावर कारवाई केली जाईल. तसेच शाळेत शिकणाऱ्या मुलींना सुरक्षेसंदर्भात माहिती द्यावी अशा सूचना देण्यात आल्या असल्याची माहिती पोलीस सहाय्यक आयुक्त संपत शिंदे यांनी दिली आहे.

### महर्षि वाल्मिकी यांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन

दैनिक आपला विदर्भ



**बुलडाणा/प्रतिनिधी** : 'रामायण' महाकाव्याचे रचनाकार महाकवी महर्षि वाल्मिकी यांची जयंती आज जिल्हाधिकारी कार्यालयात साजरी करण्यात आली. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित कार्यक्रमात जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी महर्षि वाल्मिकी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी अपर जिल्हाधिकारी सदाशिव शेलार यांच्यासह उपस्थित अधिकारी -कर्मचाऱ्यांनी प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

### मुंबईत येणाऱ्या विमानांमध्ये बॉम्ब ठेवल्याची धमकी

**मुंबई/प्रतिनिधी** : आंतरराष्ट्रीय तीन विमानांमध्ये आरडीएक्ससह दहशतवादी शिरल्याची धमकी दिल्याची घटना ताजी असताना आता देशांतर्गत दोन विमानांमध्ये बॉम्ब ठेवल्याची धमकी विमान कंपनीला प्राप्त झाली आहे. दरभंगाहून मुंबईला, तसेच लेहहून दिल्लीला जाणाऱ्या दोन विमानांमध्ये बॉम्बची ठेवल्याची धमकी देण्यात आली होती. याप्रकरणी मुंबई पोलिसांनी ट्वीटर हॅन्डलद्वारे धमकी देणाऱ्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. गुन्हे शाखाही याप्रकरणी समांतर तपास करीत आहे.

तक्रारदार धनंजय नारायणराव गावडे (५४) स्पाईस जेटमध्ये ड्युटी मॅनेजर पदावर कार्यरत आहेत. छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर ते कार्यरत आहेत. त्यांच्या कंपनीचे ऽषश्रीॢिलशक्षर्शी या नावाने अधिकृत एक्स (पूर्वीचे ट्विटर) हॅन्डल आहे. त्याचे काम गुडगाव येथे चालते. स्पाईज जेटचे स्टेशन मॅनेजर राजन प्रभाकर यांनी संदेश पाठवून त्यांच्या कार्यालयाच्या अधिकृत एक्स हॅन्डलवर झीूलहुरीव या एक्स हॅंडलवरून धमकीचा संदेश आल्याचे सांगितले. त्यात एसईजे ११६ व एसईजे १२४ या विमानांमधील बॉम्बचा लवकरच स्फोट होणार आहे.

# सिद्धार्थ खरात यांच्या नेतृत्वात विविध उपक्रम, सरस्वती कन्या विद्यालयाला सदिच्छा भेट : मुख्याध्यापिका जोहरे यांचे कौतुक

दैनिक आपला विदर्भ





**मेहकर/प्रतिनिधी** : उत्कर्ष फाऊंडेशनचे अध्यक्ष सिद्धार्थ खरात यांच्या नेतृत्वात विविध सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, साहित्यिक, कृषी, दुग्ध उत्पादक शेतकरी यांच्या हितासाठी राबविले जात आहेत. या भागातील युवकांना किमान कौशल्य विकास शिक्षण विषयी जनजागृती व्हावी, या उद्देशाने सेवा निवृत्त सहसचिव सिद्धार्थ खरात यांनी सरस्वती कन्या विद्यालय जणेफळ या शाळेला सदिच्छा भेट दिली. यावेळी मुख्याध्यापिका मिनल जोहरे यांच्या संकल्पनेतून ग्रामीण भागातील मुलींचा विद्यार्थिनींचा सर्वांगीण विकास व्हावा, यासाठी शाळेमार्फत मोफत ब्युटी पार्लर कोर्स सुरू करून त्यांना रोजगाराची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल मुख्याध्यापिका जोहरे यांचे सिद्धार्थ खरात यांनी कौतुक केले. मेहकर-लोणार मतदार संघातील तरुण मुले आणि मुलींसाठी रोजगाराची नवीन संधी निर्माण करण्याच्या उद्देशाने मेहकर येथील कृषी वैभव लॉन येथे दि.१८ ऑक्टोबर २०२४ रोजी'स्किल ऑन व्हील' हा उपक्रम अंतर्गत मेहकर-लोणार मतदार संघातील सुशिक्षित तरुण बेरोजगारांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी, या उद्देशाने रोजगार मेळाव्याचे आयोजन केले आहे. या मेळाव्याला जास्तीत जास्त संख्येने सुशिक्षित बेरोजगारांनी उपस्थित राहावे व या भागातील युवकांना किमान कौशल्य विकास शिक्षण विषयी जनजागृती व्हावी, या उद्देशाने सेवा निवृत्त सहसचिव सिद्धार्थ खरात यांनी सरस्वती कन्या विद्यालय जणेफळ या शाळेला सदिच्छा भेट दिली. या वेळी मुख्याध्यापिका मिनल जोहरे यांच्या संकल्पनेतून ग्रामीण भागातील मुलींचा विद्यार्थिनींचा सर्वांगीण विकास व्हावा, यासाठी शाळेमार्फत मोफत ब्युटी पार्लर कोर्स सुरू करून त्यांना रोजगाराची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे कार्याचा सिद्धार्थ खरात यांनी यावेळी त्यांचे कौतुक केले. यावेळी फिरके,गवई,तळेकर,हिवरकर,सीमा सरदार, जानेफळ येथील सरपंच रूपाली वडणकर,वानखेडे, मिसाळ,पुरुषोत्तम बोर्डे, गणेश सवडतकर, विशाल फितवे, अशोक शेजुळ आदींची उपस्थिती होती.

### सुशिक्षीत बेरोजगारांनी रोजगार संधीचा लाभ घ्यावा : खरात यांचे आवाहन

मेहकर-लोणार मतदार संघातील तरुण मुले आणि मुलींसाठी रोजगाराची नवीन संधी निर्माण करण्याच्या उद्देशाने मेहकर येथील कृषी वैभव लॉन येथे शुक्रवार दि.१८ ऑक्टोबर २०२४ रोजी' स्किल ऑन व्हील' हा उपक्रम अंतर्गत मेहकर-लोणार मतदार संघातील सुशिक्षित तरुण बेरोजगारांना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी, या उद्देशाने रोजगार मेळाव्याचे आयोजन केले आहे.या रोजगार मेळाव्याचा तरुण मुले व मुलींनी लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक सिद्धार्थ खरात यांनी केले.

## २२-बुलढाणा विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४; निवडणूकीसाठी प्रशासन सज्ज

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी** : भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ चा कार्यक्रम जाहीर केला असून दि. १५ ऑक्टोबर २०२४ रोजी पासून आचारसंहिता लागू झाली आहे. २२ बुलढाणा विधानसभा मतदारसंघासाठी बुधवार दि. २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. त्याअनुषंगाने बुलढाणा विधानसभा मतदार संघासाठी प्रशासन सज्ज असून निवणूक कामाचे नियोजन करण्यात आले आहे, अशी माहिती उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी शरद पाटील यांनी दिली.

निवडणूक कार्यक्रम याप्रमाणे : २२-बुलढाणा विधानसभा मतदारसंघ निवडणूकीची अधिसूचना मंगळवार दि. २२ ऑक्टोबर रोजी प्रसिध्द करण्यात येईल. मंगळवार दि. २९ आक्टोबर हा नामनिर्देशन पत्र सादर करण्याचा अंतिम दिनांक असणार आहे. बुधवार दि. ३० ऑक्टोबर रोजी नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यात येणार आहे. सोमवार दि. ४ नोव्हेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहे. बुधवार दि. २० नोव्हेंबर रोजी मतदान तर शनिवार दि. २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. निवडणूक प्रक्रिया २५ नोव्हेंबरपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे.

३ लाख मतदार मतदानाचा हक्क बजावणार : पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत १५ ऑक्टोबर रोजी २२-बुलढाणा विधानसभा मतदारसंघ मतदारांची संख्या याप्रमाणे : पुरुष मतदार १ लक्ष ५८ हजार ७८७, महिला मतदार १ लक्ष ४६ हजार ८८२ तर तृतीयपंथी १६ असे एकूण ३ लक्ष ५ हजार ६८५ मतदारांना मतदानाचा हक्क बजावता येईल. सर्व्हिस व्होटर १०९०, दिव्यांग मतदार २०८२, वयवर्षे ८५ पेक्षा जास्त असलेले ४७८६ मतदार असून, दिव्यांग व ८५ पेक्षा जास्त असलेल्या वयोमानातील मतदारांना होम वोटींग सुविधा पुरविण्यात येणार आहे.

३३७ मतदान केंद्र :

२२-बुलढाणा विधानसभा मतदारसंघात निवडणूकीसाठी ३३७ मतदान केंद्रावर मतदान घेण्यात येणार असून, त्यामध्ये ७९ शहरी मतदान केंद्र व २५८ ग्रामीण मतदान केंद्र आहेत. बुलडाणा विधानसभा मतदारसंघाकरीता एफएसटी पथक -५, एसएसटी पथक-६, व्हीएसटी -४ पथक सज्ज असून सदर पथके २४ तास कार्यरत ठेवण्यात आले आहे. तसेच मतदान केंद्रनिहाय एकूण ३१ क्षेत्रिय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. निवडणूकीच्या कामाकरिता १ हजार ८५० अधिकारी/कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

कामकाजाचे व्यवस्थापन : बुलडाणा विधानसभा मतदारसंघ कार्यालय, तहसिल कार्यालयाच्या बाजूला जिल्हा निवडणूक इमारत येथे नामनिर्देशन पत्रे सादर करणे, नामनिर्देशनपत्राची छाननी केली जाईल. निवडणूकीसंबंधी अधिकारी व कर्मचारी यांचे प्रशिक्षण सहकार विद्या मंदिर, चिखली रोड, बुलडाणा येथे होईल. शारदा विद्यालय, चिखली रोड, बुलडाणा येथे मतदान साहित्य वाटप व साहित्य जमा केले जाईल. तसेच बुलडाणा विधानसभा मतदारसंघ कार्यालय, तहसिल कार्यालयाच्या बाजूला जिल्हा निवडणूक इमारत येथे स्ट्राँग रुमची व्यवस्था व मतमोजणीचे ठिकाण राहिल.

### अविनाश मिश्राच्या बेघर होण्याच्या घोषणेनंतर ईशा सिंहच्या डोळ्यात अश्रू

**मुंबई/प्रतिनिधी :** 'बिग बॉस १८'च्या सुरुवातीपासून अविनाश मिश्रा चर्चेत आहे. १६ ऑक्टोबर रोजी प्रसारित झालेल्या एपिसोडमध्ये 'बिग बॉस'नं दिलेल्या टास्क दरम्यान अविनाश घरातील काही सदस्यांबरोबर वाईट पद्धतीनं भांडताना दिसला.

यावेळी अविनाशचे घरातील सदस्यांबरोबरचे भांडण इतके वाढले की, 'बिग बॉस'नं अचानक अविनाशला घरातून बाहेर काढण्याची घोषणा केली. या घोषणेनंतर अविनाशची मैत्रिण ईशा सिंह रडते आणि अविनाशच्या वतीनं सॉरी म्हणते. सध्या रि?लिटी शो 'बिग बॉस १८'मध्ये गोंधळ सुरू असल्याचं दिसत आहे.

दुसरीकडे, आता विवियन डिसेना आणि रजत दलाल यांच्यात जेवणावरून लढत शोमध्ये पाहायला मिळत आहे. दोघेही उद्धटपणा दाखवताना आणि एकमेकांना धमकावताना एका व्हिडिओत दिसत आहे. बिग बॉस १८ च्या प्रोमोमध्ये असं दाखवण्यात आलं आहे की, विवियन डिसेना खूप रागावलेला दिसत आहे आणि म्हणतो की, ''मी जेवणामध्ये सर्व काही खाऊ शकतो. मी गॅस देखील चालू करू शकतो आणि मला कोणीही रोखू शकणार नाही.'' यानंतर रजत म्हणतो, ''तू म्हणालास की मी गॅस चालू करून दाखवतो, मला कोणी अडवू शकत नाही. चला आता गॅस चालू करू दाखव, हा मी हात चढवेल तुझ्यावर, तू आतमध्ये असेल, तेव्हा मी तुला नक्की अडवेल.'' हे ऐकून विवियन एक व्यंग्यात्मक स्मितहास्य करत म्हणतो, ''चल ठिक आहे आता अडवून दाखव मला, एका टाईम तू अडव.''

### सावधान ! तुमच्या सोशल मिडीया खात्याची निगराणी होत आहे

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी** : विधानसभा निवडणूक व लोकसभा पोटनिवडणुकीच्या काळात माध्यम प्रमाणिकरण व संनियंत्रण समितीमध्ये सदस्य असणाऱ्या सायबर विभागाच्यामार्फत जिल्ह्यातील सोशल मीडियाचे सनियंत्रण जिल्ह्यामध्ये सुरू झाले आहे. त्यामुळे समाज माध्यमांवर राजकीय पोस्ट टाकताना सर्वांनी सावध असावे, आचारसंहितेचा भंग झाल्यास तात्काळ गुन्हे दाखल होण्याची शक्यता असल्याचे प्रशासनाने कळविले आहे.

नांदेड जिल्ह्यामध्ये आचारसंहितेचे काटेकोर पालन करण्याबाबत जिल्हाधिकारी अभिजीत राऊत जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार व पोलीस दलातील अन्य सदस्यांची यासंदर्भात बैठक झाली असून सायबर सेलला निर्देश देण्यात आले आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयातील सायबर सेलचे पोलीस निरीक्षक धीरज चव्हाण यांच्या मार्गदर्शनात एमसीएमसी ( माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समिती ) मध्ये सायबर सेलची एक संपूर्ण टीम यासाठी कार्यरत झाली आहे. यापूर्वी लोकसभा निवडणुकीमध्ये या सेलमार्फत काही गुन्हे दाखल झाले होते. जिल्ह्यातील नागरिकांच्या फेसबुक,ट्विटर, इंस्टाग्राम, व्हाट्सअप अकाउंटवर जातीवाचक, धर्माधर्मामध्ये तेढ निर्माण करणाऱ्या, राजकीय वैमनस्य वाढवणाऱ्या पोस्ट काही समाजकंटक, असामाजिक तत्व टाकण्याची शक्यता नाकारता येत नाही. निवडणूक काळामध्ये सामाजिक स्वास्थ्य बिघडवण्यासाठी काही घटक अशावेळी कार्यान्वित होतात. अशांना लक्षात घेऊन सर्वांच्या सोशल माध्यमांची तपासणी सुरू झाली आहे. विशेषतः यापूर्वी अशा पद्धतीच्या विचित्र पोस्ट टाकणाऱ्या काही असामाजिक तत्त्वासंदर्भात सायबर सेल आणखी सतर्क झाले आहे. त्यामुळे अशा कोणत्याही पोस्ट आपल्या अकाउंट वरून फॉरवर्ड होणार नाही. प्रसारित होणार नाही. याची काळजी नागरिकांनी घ्यावी, असे आवाहन जिल्हा व पोलीस प्रशासनाने केले आहे. कधीतरी कुठेतरी झालेली घटना पुन्हा पुन्हा दाखवणे,धार्मिक स्थळांच्या तोडफोडीचे जुने व्हिडिओ दाखवणे,चुकीचे व्हिडिओ व्हायरल करणे, समाज,धर्म धोक्यात असल्याच्या खोट्या आकडेवारीला सादर करणे, चुकीचे तपशील दाखवणे, असभ्य व्हिडिओ व्हायरल करणे, चित्रफितीशी छेडछाड करणे, चुकीचे अर्थ निकेल अशा पद्धतीचे एडिटिंग करणे, अशा प्रकारच्या कुरापती केल्या जाऊ शकतात. नागरिकांनी अशा पद्धतीचे व्हिडिओ कुठे टाकले गेले असेल तर जवळच्या पोलीस स्टेशनला लक्षात आणून देण्याचे आवाहन शासनाने केले आहे . जिल्ह्यामध्ये आदर्श आचारसंहिता लागली असून कुटुंबप्रमुखांनी,वडीलधाऱ्यांनी आपल्या घरातील सर्व मोबाईल धारकांना या संदर्भात अवगत करावे. तसेच व्हाट्सअप ग्रुपच्या सर्व डमिनने यासंदर्भात आपल्या ग्रुपमध्ये सूचना टाकावी. पुढील ४० दिवस सामाजिक स्वास्थ बिघडवेल अशा पद्धतीचे कोणतेही पोस्ट पडणार नाही, याची काळजी एडमिनने घ्यावी, अशीही प्रशासनाने सूचना केली आहे.

# मायबाप शेतकऱ्यांनो आत्महत्या करु नका

## समाज प्रबोधनकार सत्यपाल महाराज यांचे शेतकऱ्यांना कळकळीचे आवाहन : कीर्तनातून शेतकरी बांधवांच्या प्रश्नांना फोडली वाचा

दैनिक आपला विदर्भ





**मेहकर/प्रतिनिधी** : देऊळगाव साकरशा.मायबाप शेतकर्यांनो तुम्ही कतीही संकटे आले तरी खचू नका, आत्महत्या करू नका आणि जमिनी विकू नका,येणारा काळ हा फक्त तुमचाच आहे. पोटाची भूक ही पैशातून नाही तर जमिनीतून पिकलेल्या शेतमालातून भागविली जाणार आहे. त्यामुळे तुम्ही खचू नका, असे कळकळीचे आवाहन समाजप्रबोधनकार सप्तखंजेरीवादक सत्यपाल महाराज यांनी आपल्या कीर्तनाच्या माध्यमातून केले.

उत्कर्ष फाउंडेशनच्या वतीने देऊळगाव साकरशा येथे दि.१६ ऑक्टोबर रोजी आयोजित कार्यक्रमात सुप्रसिद्ध कीर्तनकार तसेच सप्तखंजेरी वादक,समाज प्रबोधनकार सत्यपाल महाराज प्रबोधन करताना बोलत होते. यावेळी त्यांनी दहावी, बारावीचे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, ज्यांनी मुलगा-मुलगी एकसमान मानून फक्त दोन मुलींची माता होण्याचा निर्णय घेतला, अशा धाडसी माता-भगिनींचा साडी देऊन सत्कार केला आला.

तसेच सैनिकाच्या आईचा सुद्धा यावेळी कृतज्ञतापूर्वक सत्कार केला. यावेळी सत्यपाल महाराजांनी आपल्या विनोदी शैलीतून महिलांच्या, शेतकरी बांधवांच्या प्रश्नांवर भाष्य केले. आपल्या कीर्तनातून या प्रश्नांविषयी लोकांमध्ये जागृती निर्माण केली. आजुबाजुला चांगला समाज घडविण्यासाठी काय करावे, याविषयी लोकांचे प्रबोधन केले. लहान मुलांना त्यांनी आपल्या महापुरूषांबद्दल प्रश्न विचारले, अचूक उत्तर देणाऱ्यांना बक्षिसे दिली. त्याचबरोबर या कार्यक्रमात गुणवंत, होतकरू विद्यार्थी ज्यांनी कठीण परिस्थितीशी सामना करत उत्तम यश प्राप्त केले त्यांचा यथोचित गौरव केला.

यावेळी सिद्धार्थ खरात उत्कर्ष फाउंडेशन संस्थापक अध्यक्ष सिद्धार्थ खरात, शिवसेना उपजिल्हाप्रमुख आशिष रहाटे, तालुकाध्यक्ष निंबाजी पांडव, प्रमोद देशमुख, जानेफळचे पोलिस निरीक्षक मोरे,ड. संदीप गवई, स्व.आनंदरावबापू देशमुख गुरुदेव सेवा भजनी मंडळ, नूतन विठ्ठल सांप्रदायिक भजनी मंडळ,सावित्रीबाई फुले महिला मंडळ,माता रमाई महिला मंडळ,सेवालाल महाराज भजनी मंडळ, भगतसिंग मित्र मंडळ देऊळगाव साकरशा यांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. ओम सोनुने यांनी कार्यक्रमाचे संचालन करून आभार मानले.

### समाजप्रबोधनकार सत्यपाल महाराज यांचा सत्कार करण्याचा योग

समाजप्रबोधनकार, सप्तखंजेरीवादक सत्यपाल महाराज तथा या कार्यक्रमाच्या निमित्ताने महाराजांचा सत्कार करण्याचा योग मिळाला.अशी प्रतिक्रिया उत्कर्ष फाउंडेशनचे अध्यक्ष तथा कार्यक्रमाचे आयोजक सिद्धार्थ खरात यांनी व्यक्ती केली.